ध्वनी : ९१-२२-२२६१४३९१
: ९१-२२-६६५६४०५१
फॅक्स नं. : ९१-२२-२२६१९०१६
ई मेल : tm@mbptmail.com
Telephone : 91-22-22614391
: 91-22-66564051
Fax No. : 91-22-22619016
E-mail : tm@mbptmail.com

# मुंबई पोर्ट ट्रस्ट
# Mumbai Port Trust

यातायात प्रबंधक का कार्यालय,
पत्तन भवन,
शूरजी वल्लभदास मार्ग,
मुंबई – ४०० ००१.
Traffic Manager's Office,
Port House,
Shoorji Vallabhdas Marg,
Mumbai – 400 001.

क.टिएम/एम/१३ - ५/आरटीआय/१९७/१/383 24 APR 2019

श्री.रोशन शेख, अध्यक्ष राष्ट्रहित संघटना,
४९, चंदन निवास, पेट्रोल पंप समोर,
छत्रपती शिवाजी रोड, दहिसर (पू),
मुंबई ४०० ०६८.

रजिस्ट्री रसीद डाक / REGD. A.D.

विषय : माहितीचा अधिकार कायदा २००५ च्या अन्वये मागितलेली महिती.
संदर्भ : आपला अर्ज दि. ०१.०४.२०१९.

---------------

महोदय,

वरील उल्लेखित अर्जाद्वारे आपण हाजी बंदर / हे बंदर मुंबई पोर्ट ट्रस्ट येथे रेती आयात करण्यासंदर्भात माहिती मागितलेली आहे.

२. आपणांस ही माहिती देण्याकरीता आम्ही माहितीचा अधिकार कायदा २००५च्या कलम ५( ४ ) अन्वये वाहतूक विभागाच्या संबधित अनुभागाकडून माहिती मागितली होती.

३. संबधित अनुभागाकडून प्राप्त माहिती खालीलप्रमाणे आहे:-

1) युनियन ॲग्रीकल्चर मिनीस्ट्री कडून सवलती घेण्याबाबतची माहिती आमच्याकड़े नाही,
2) हे बंदर (Hay Bunder) येथे रेती हाताळली जात नाही.
3) हाजी बंदर येथे रेती हाताळली जाते. या संदर्भात लिखित प्रक्रिया उपलब्ध नाही.
4) तथापी, सदर प्रक्रिया खालिलप्रमाणे आहे.
    a) आयातदार रेतीच्या स्टोरेजसाठी वाहतुक प्रबंधक यांस अर्ज करतो. सोबत मुंबई कस्टम प्रमाणित इम्पोर्ट जनरल मॅनीफेस्ट ( आय.जी.एम. ) / कार्गो घोषणा पत्रक किंवा बिल ऑफ एन्ट्री / बिल ऑफ कोस्टल गुड्स जोड़णे आवश्यक आहे.
    b) वाहतुक प्रबंधकांच्या मान्यतेनंतर 30 दिवसांसाठी स्टोरेजसाठी परवानगी दिली जाते. स्टोरेज शुल्क आगाऊ भरावे लागतात.
    c) बार्ज ऑपरेटर, उप वाहतुक प्रबंधक, कंन्टेनर फ्रेट स्टेशन ( सी एफ एस ) यांच्याकड़े बार्ज बर्थिंगसाठी अर्ज करतात. सोबत आवश्यक दस्तावेज व मासिक शुल्क भरल्याची पावती जोड़णे आवश्यक आहे.
    d) उप वाहतुक प्रबंधक, सी एफ एस, बार्ज बर्थिंगसाठी परवानगी देतात.
    e) आयातदाराने आगाऊ शुल्क भरुन दस्तावेज सबंधित मुंबई पोर्ट ट्रस्ट अधिकारयाकड़े जमा करणे आवश्यक आहे.

f) आयात मंजुरीसाठीची कस्टम औपचारिकता आयातदाराने पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच कस्टम आउट ऑफ चार्ज व आवश्यक दस्तावेज हाजी बंदर येथे जमा करणे.

g) तद् नंतर आयातदार बार्जमधून रेती थेट ट्रकवर भरतात व रेती स्टोरेज एरियामधे उतरवली जाते.

h) आयातदार स्टोरेज परवानगी दिलेल्या अवधीत स्टोरेज एरियामधून रेती घेऊन जातो.

५. जर आपल्याला वरील मत अमान्य असेल तर आपण श्रीमती एस.जी. पटवर्धन, प्रवर उप सचिव, मुंबई पोर्ट ट्रस्ट आणि अपील अधिकार, दुसरा माळा, पोर्ट भवन, शूरजी वल्लभदास मार्ग, बलार्ड इस्टेट, मुंबई – 400 001 यांचेकडे हे पत्र मिळाल्यापासून ३0 दिवसांच्या आत अपील करू शकता. त्यांचा ईमेल आयडी spatwardhan@mbptmail.com आणि संपर्क क्रमांक 022-66564047 आहे. अपीलाची नमूना प्रत 'ड' सोबत जोडत आहे.

संलग्न : वरीलप्रमाणे

आपला विश्वासू

24/4/19

(शा. ह. तिवारी)
उप. यातायात प्रबंधक (सा.) आणि
केंद्रीय जन माहिती अधिकारी (यातायात)
संपर्क क्रमांक : 022-66564053
ईमेलआयडी:shtiwari@mbptmail.com

24/4/19